# फ्रान्सचे राजदुत फ्रानकॉईस रिचर यांचे नेतृत्वात शिष्टमंडळाची म.न.पा.स सदिच्छा भेट नागपूर शहर स्मार्ट सिटी प्रस्तावाचे सादरीकरण

स्मार्ट सिटी संदर्भात फ्रान्स सरकार भारत सरकारशी सहकार्य करणार असून त्याचाच एक भाग म्हणून फ्रान्सचे राजदूत फ्रानकॉईस रिचर यांच्या नेतृत्वात 10 सदस्यीय शिष्टमंडळाने नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी स्थायी समिती सभापती रमेश सिंगारे यांनी त्यांचे म.न.पा.स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ व तुळशीचे रोपटे देवून स्वागत केले. शिष्टमंडळात मिनीस्टर काऊन्सलर जीनरेने काऊगार्ड, काऊन्सलर इंलिका मान, निकोलस फोरेंज, दिनेश बोहरा, सुनिल कुमार, धनंजय केतकर, डेव्हीड मॉस्कोव्हीज, अपूर्वा धर, रविकांत याचेसह इंजिनिअरिंग प्रोजक्टस इंडीया लि. चे एस.पी.एस. बक्षी, एम.के.गुप्ता, कपिल तारा आदिचा समावेश होता.

यावेळी म.न.पा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांनी नागपूर शहर संभाव्य स्मार्ट सिटी म्हणून विकसित करणाच्या दृश्टीने तयार करण्यात आलेल्या प्रस्तावाची माहिती दिली. आणि त्यादृश्टीने पावर पाईंट सादरीकरण केले. तसेच नागनदी सौंदर्यीकरणा बाबत सादरीकरण केले. त्यानंतर नागपूर मेट्रो रेल्वेचे प्रबंध संचालक ब्रजेश दीक्षित व त्यांच्या सहाकाऱ्यांनी नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पावर पाईंट व्दारे माहिती सादर केली.

यावेळी फ्रान्सचे राजदूत फ्रानकॉईस यांनी फ्रान्स सरकार तांत्रिक सहकार्यास तयार असल्याचे सांगितले तसेच याबाबत फेब्रुवारी 2016 मध्ये अधिक तपशीलवार चर्चा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी त्यांचे समवेतच्या अन्य उपस्थितांनी त्यांच्या संस्थेच्यावतीने आवश्यक ते सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

यावेळी सत्तापक्षनेते दयाशंकर तिवारी, रा.काँ. पक्षनेते राजु नागुलवार, ब.स.पा. गटनेते गौतम पाटील, नागपूर मेट्रो रेल्वेचे प्रबंधक संचालक ब्रजेश दीक्षित, पोलिस आयुक्त एस.पी. यादव, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती श्याम वर्धने, जिल्हाधिकारी सचिन कुर्वे, अपर आयुक्त श्रीमती नयना गुंडे, उपायुक्त संजय काकडे, अति. उपायुक्त प्रमोद भुसारी व जयंत दांडेगावकर, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, अधीक्षक अभियंता शशिकांत हस्तक व प्रकाश उराडे, आरोग्य उपसंचालक डॉ. मिलींद गणवीर यांचेसह म.न.पा.चे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# ईसरायलचे काउन्सेलेट जनरल डेव्हीड अॅकोव्ह यांची म.न.पा.स सदिच्छा भेट
# नागपूर शहर स्मार्ट सिटी प्रस्तावाचे सादरीकरण

ईसरायलचे मुंबई येथील दुतावासातील काउन्सेलेट जनरल श्री. डेव्हीड अॅकोव्ह यांनी आज दिनांक 18.12.2015 रोजी दुपारी 3.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयास सदिच्छा भेट दिली असता मा. सत्तापक्षनेते श्री. दयाशंकर तिवारी यांनी त्यांचे पुष्पगुच्छ व तुळशीचे रोप देऊन स्नेहील स्वागत केले. काउन्सेलेट जनरल यांचे समवेत प्रेस अॅन्ड इंफोमेशन ऑफीसर श्री.अनय जोगळेकर हे देखील उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिका सिव्हील कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील सभागृहात म.न.पा. आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर यांनी नागपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणारे विविध प्रकल्प, स्मार्ट सिटी, नागनदी, 24*7 पाणी पुरवठा योजना, वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लांट तसेच नागपूर शहर संभाव्य स्मार्ट सिटी म्हणून विकसीत करण्याच्या दृश्टीने तयार करण्यात आलेल्या प्रस्तावाची सविस्तर माहिती देऊन स्मार्ट सिटी प्रकल्पाचे व प्रस्तावित सीटी सव्हीलन्स प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण केले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना ईसरायलचे काउन्सेलेट जनरल डेव्हीड अॅकोव्ह यांनी शहर सुधारणेकरीता नागपूर महानगरपालिका करीत असलेल्या विविध प्रयत्नांचे कौतुक करून प्रशंसा केली. तसेच ईसरायल सरकार नागपूर महानगरपालिकेस तंत्रज्ञानाच्या बाबतीत सर्वातोपरी सहकार्य करण्यास तयार असल्याचे स्पश्ट केले. व त्या अनुशंगाने लवकरच अधिक तपशीलवार चर्चेसाठी येणार असल्याचे संकेत सुध्दा त्यांनी यावेळी दिले.

यावेळी अति. उप आयुक्त श्री. जयंत दांडेगावकर, अधिक्षक अभियंता श्री. शशिकांत हस्तक, कार्यकारी अभियंता सर्वश्री श्याम चव्हाण, महेश गुप्ता यांचेसह म.न.पा. चे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# डी.पी. रोड संदर्भात म.न.पा. व नासुप्र अधिकाऱ्यांनी एकत्रीत बसुन ॲक्षन प्लान तयार करावा.... मा. महापौर श्री. प्रवीण दटके



शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृश्टीकोनातून कोणत्याही स्थितीत शहरातील रस्ते बांधावयाचे असल्यामुळे प्रशासनिक स्तरावर म.न.पा. व नासुप्रच्या अधिकाऱ्यांनी एकत्रीत बसुन ॲक्षन प्लान तयार करावा असे निर्देश मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी दिलेत.

आज सोमवार दिनांक 21.12.2015 रोजी दुपारी 1.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली डी.पी.रोड संदर्भात म.न.पा. व नासुप्र अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली.

या आढावा बैठकीला सभापती स्थायी समिती श्री. रमेश सिंगारे, सत्तापक्षनेता श्री. दयाशंकर तिवारी, सभापती स्थापत्य, विद्युत व प्रकल्प विषेश समिती श्री. सुनिल अग्रवाल, म.न.पा. आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, नासुप्र सभापती श्री. श्याम वर्धने, अपर आयुक्त डॉ.आर. झेड. सिद्दीकी, अधिक्षक अभियंता श्री. प्रकाश उराडे, अधिक्षक अभियंता (नासुप्र) श्री. एस.एच. गुज्जलवार, कार्यकारी अभियंता (पश्चिम) नासुप्र श्री. अशोक गौर, कार्यकारी अभियंता (दक्षिण) नासुप्र श्री. राजीव पिंपळे, कार्यकारी अभियंता (पूर्व) नासुप्र श्रीमती एन.एस.अंसारी, सहाय्यक संचालक (नगररचना) सुश्री सुप्रिया थुल, कार्यकारी अभियंता सर्वश्री दिलीप जामगडे, महेश गुप्ता, मनोज तालेवार, संजय गायकवाड, राजेश भुतकर, स्थावर अधिकारी श्री. डी.डी. जांभुळकर सह सर्व दहाही झोनचे सहाय्यक आयुक्त प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी कार्यकारी अभियंता श्री. दिलीप जामगडे यांनी शहरात मौरेस कॉलेज टी. पांईट ते सायंन्स् कॉलेज, महाराजबाग रोड आणि मोरभवन रस्त्याचा डी.पी.रोड संदर्भात म.न.पा. द्वारा सुरू असलेल्या कामासंदर्भात सविस्तर माहिती सादर करून 113 रस्त्यांपैकी 78 रस्त्यांची तपशीवार माहिती नागपूर सुधार प्रन्यास ने आपल्याकडे सादर केली असल्याचे त्यांनी यावेळी माहिती देतांना सांगीतले.

शहरातील डी.पी. रोड संदर्भात प्रायरेटी ठरावा, पहिल्या टप्यात कमीत कमी नागपूर सुधार प्रन्यासच्या कक्षेतील 25 रस्त्यांची कामे सुरू करण्याचे निर्देश मा. महापौर श्री. प्रवीण दटके यांनी बैठकीत दिलेत.

# इतवारी दहिबाजार व मस्कासाथ पूलाचे निगम आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर व्दारा निरिक्षण

26 जानेवारी पावेतो इतवारी पूलाचे काम पूर्ण करण्याचे आयुक्तांचे निर्देश. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर यांनी इतवारी (दहीबाजार) येथे बांधकाम सुरू असलेल्या रेल्वे उड्डाण पुलाच्या कामाचे आज दिनांक 29 डिसेंबर, 2015 रोजी म.न.पा.व रेल्वे अधिकाऱ्यासमवेत निरिक्षण करून सुरू असलेल्या कामाचा आढावा घेताल. या पुलाचे मारवाडी चौक ते मेंहदीबाग टप्पा-1 चे बांधकाम सन 2013-14 मध्ये पुर्ण झाले असून हा पु वाहतुकीस सुरू झालेला आहे. टप्पा-2 मध्ये मारवाडी चौक ते इतवारी रेल्वे स्टेशन कडील जुना पुल तोडुन त्याठिकाणी नव्याने फाऊंडेशन तयार करून पुलाचे बांधकाम सुध्दा पूर्णत्वास आलेले आहे.

या पुलावरील तथा पुलाच्या पोच रस्ता तथा स्लीप रोडचे डांबरीकरणाचे काम, पुलावरील इलेक्ट्रीक पोल फिटींगचे काम तथा पेंटींगचे काम तसेच मारवाडी चैकातील ट्रान्सफॉर्मर शिफ्टींगचे काम शिल्लक आहे. आयुक्त यांनी या पुलाचे सर्व कामे 26 जानेवारी, 2016 पर्यंत पुर्ण करण्याचे कामाचे कंत्राटदार मे.वतनसिंघ ॲण्ड कंपनी यांना निर्देश दिलेत व इतवारी रेल्वे पूलावर दोन्ही बाजूंनी लोखंडी जाळी लावा जेणेकरून कोणीही पूलाखाली कचरा टाकणार नाही, असेही निर्देश यावेळी आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर यांनी दिले तसेच यांनतर आयुक्त यांनी मस्कासाथ येथे (किराणा ओली ते राऊत चौक) बांधकाम सुरू असलेल्या रेल्वे उड्डाण पुलाच्या कामाचे सुध्दा निरिक्षण केले व सुरू असलेल्या क्लोझींग वॉल च्या कामाची पाहणी केली. या पुलाचे फाऊंडेशनचे काम पूर्णत्वास आले असुन पुढील दोन आठवडयात स्टील गर्डर लॉनचींगचे काम करण्यात येईल अशी माहिती कंत्राटदार मे.वतनसिंघ ॲन्ड कंपनी यांचे प्रोजेक्ट मॅनेजर यांनी दिली.

या पुलाचे ॲप्रोचेस सह सर्व कामे 31.03.2016 पर्यंत पुर्ण करावेत असे निर्देश मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डिकर यांनी दिलेत. उक्त दोन्ही निरिक्षण दौऱ्यात द.म.पु.रेल्वे चे सिनिअर डिव्हीजनल अभियंता श्री.अखिलेश साहु व उपडिव्हीजनल अभियंता श्री.डी.दत्ता, म.न.पाचे नगरयंत्री श्री.मनोज तालेवार, उपविभागीय अभियंता श्री.डी.डी.जांभुळकर, रेल्वे कंसलन्टट मे. राईट्स यांचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री.राजकुमार कंत्राटदार मे.वतनसिंघ ॲन्ड कंपनी यांचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री.रामचंद्र व कामाचे पी.एम.सी.मे.एस.एन.भोबे ॲन्ड एसोसिएटस यांचे इंजीनिअर म.न.पा.चे शाखा अभियंता श्री.शकील नियाजी व संबंधीत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.